REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख २ जून, १९४८ | अंक २२


## दि न्यू सिटिझन बँक
### ऑफ इंडिया, लि.

**हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई**

एकूण खेळतें भांडवल : ३,५०,००,००० रु. वर
वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : १२,००,०००रु वर

★ बँक स्ट्रीटवर ★

**३,१७,००० रुपयांची बँकेची स्वतःची इमारत**

**स्थानिक शाखा :** १ दादर, २ गिरगाव, ३ सँडरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शीव, ७ विलेपार्ले.

**इतर शाखा :** ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ कॅडांक टाऊन ( सी. पी. ), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव ( पंजाब ), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव, ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहूपुरी, ४२ सिन्नर, ४३ सिताबर्डी, ४४ यवतमाळ, ४५ शिवाजी नगर ( पुणें ), ४६ शहापूर ( बेळगांव ) ४७ नामपूर ( नाशिक ).

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

भागीदारांची संख्या २,२०० वर ठेवीदारांची संख्या ५०,००० वर.

**डी. एन. गांडेकर,**
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजर, पुणें शाखा.
( बुधवार चौक )

**डी. डी. देशपांडे,** बी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
| --- | --- | --- |
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

**मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

**जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर**

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

**द. दि. चितळे**
मॅनेजिंग डायरेक्टर

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें










वर्कशॉप मशिनरी (२)
हेवी ड्यूटी
शिमोगा लेथ
(८″—१०″)
संपूर्ण देशी पहिल्या प्रतीचा, तज्ञांचे देखरेखीखालीं कुशल कारागिरांनीं अद्यावत् साधनांनीं बनविलेला
— चौकशी स्थान —
केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २.

# विविध माहिती

**ट्यूब विहिरींसाठीं अमेरिकन तज्ञ**—"अधिक धान्य पिकवा" मोहिमेस सहाय्य करण्याच्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें येत्या ५-६ वर्षांत ६,००० ट्यूब विहिरी खोदण्याची योजना आखली आहे. सरकारनें अमेरिकेंतून दोन तज्ञ मागविले आहेत, ते ट्यूब विहिरींच्या खोदाईच्या तपशिलवार योजना तयार करतील. संयुक्तप्रांत व बिहार ह्या प्रांतांतच असल्या विहिरींचा प्रश्न मुख्यतः आहे.

**हाडांच्या सापळयांचा विमा**—ऑस्ट्रेलियांत ९२ चिनी मरण पावले. त्यांच्या हाडांचे सापळे पुरण्यासाठी चीनमध्यें नेण्यांत आले. ह्या हाडांच्या सापळयांचा ऑस्ट्रेलियन कंपन्यांत विमा उतरण्यांत आला. सापळे उकरण्यास व त्यांची वहातुक करण्यास ज्या प्रमाणांत खर्च आला (प्रत्येकीं १० पौंड ते ३० पौंड), त्या प्रमाणांत विम्याचे हप्ते घेण्यांत आले.

**पूर्व बंगालमधील सिनेमागृहें बंद ?**—पाकिस्तानच्या मध्यवर्ती सरकारनें सिनेमा फिल्मवर दर फुटास दोन आणे जकात बसविली, त्यामुळें पूर्व बंगालमधील सिनेमागृहें बंद पडण्याचा संभव आहे.

**शिपिंग कॉर्पोरेशन्सचे मॅनेजिंग एजंटस**—हिंदुस्थान सरकार तीन मोठ्या शिपिंग कॉर्पोरेशन्स काढणार आहे. त्यांच्या मॅनेजिंग एजन्सीज शिंदा स्टीम नॅव्हिगेशन कं., इंडियन स्टीम नॅव्हिगेशन कं. व दि भारत लाइन ह्यांस मिळणार आहेत असें समजतें. एकूण शेअर भांडवलाच्या ५१% भांडवल सरकार घालील, २६% मॅनेजिंग एजंटस पुरवतील व २३% लोकांना घेतां येईल. ११ डायरेक्टरांपैकीं सरकार ६ ची नेमणूक करील. मॅनेजिंग एजंटांचे ३ डायरेक्टर रहातील व भागीदारांच्या वाटणीस २ डायरेक्टर येतील.

**अहमदाबादचें रेडिओ स्टेशन**—अहमदाबाद येथें रेडिओ स्टेशन स्थापन करण्याची पूर्वतयारी चालू आहे.

**दि स्टेट बँक ऑफ पाकिस्तान**—रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया सध्या जें काम करते, तें हातीं घेण्यास वरील बँक १ जुलै पासून प्रारंभ करील. चलन, राष्ट्रीय कर्ज, हुंडणावळ इत्यादि कामें तिच्याकडे येतील व पाकिस्तानी सरकारची ती बँकर होईल. ३ कोटी रु. भांडवलापैकीं ५१% सरकार देईल व ४९% लोकांना उपलब्ध होईल. ८ डायरेक्टरांपैकीं ३ भागीदारांनीं निवडलेले रहातील. ढाका, कराची व लाहोर येथें बँकेचीं लोकल बोर्डें काम पहातील भागीदारांस ४% क्युम्युलेटिव्ह डिव्हिडंड मिळेल. कोणासही प्रत्येकीं ५०० पेक्षा अधिक (प्रत्येक शेअर १०० रुपयांचा) शेअर्स धारण करतां येणार नाहींत.

**जपान आगबोटी बांधणार**—जपान १ लक्ष, २० हजार टनांच्या १५ आगबोटी अमेरिका, फिलिपाइन्स, नॉर्वे, इत्यादि देशांच्या ऑर्डरीनुसार बांधीत आहे.

**हैद्राबाद बँकेची कराची शाखा**—हैद्राबाद स्टेट बँक लि.ची कराची येथील शाखा ता. २० मे रोजीं सुरू झाली. ह्या बँकेच्या निजाम हद्दींत ३८ व मुंबई आणि मद्रास येथेंहि शाखा आहेत.

**मिस फ्लॉरेन्स नाइटिंगेल फंडांतून ग्रँट द्या**—खेडेगांवांत स्वच्छता राखण्यासाठी मिस फ्लॉरेन्स नाइटिंगेल व्हिलेज सॅनिटेशन फंडांतून प्रत्येकीं १५० रुपयांच्या अशा वार्षिक ग्रँट देण्यांत येतात. अशी स्वच्छता राखण्याचें काम करणाऱ्या संस्थांना आर्थिक सहाय्य हवें असल्यास त्यांनीं सोशल सर्व्हिस लीग, मुंबई ४ ह्यांचेकडे आपले रिपोर्ट पाठवून अर्जाचे नमुने मागवावेत.

**पाकिस्तानांत कापडाच्या गिरण्या**—येत्या दोन वर्षांत पाकिस्तानांत कापडाच्या दहा गिरण्या उघडण्यांत येतील अशी वार्ता आहे. दरम्यानच्या काळांत ३ लाख हातमाग चालू करून १० लाख लोकांना रोजगार देण्याची योजना आंखण्यांत आली आहे. योजनेचा पुरस्कार पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल मि. जिना हे स्वतःच करीत आहेत.

**पाकिस्तानांतून कापसाची आयात**—हिंदुस्थान आणि पाकिस्तान ह्यांच्यांत झालेल्या कराराप्रमाणें पाकिस्तानकडून हिंदुस्थानाला ३०,५६१ गांठी कापूस आतांपर्यंत मिळाला आहे. पाकिस्तानकडून हिंदुस्थानला एकूण २ लाख गांठी कापूस मिळावयाचा आहे. हिंदुस्थान सरकारनें ५,५०० कापसाच्या व सुताच्या गांठी पाकिस्तानांत पाठविण्यासाठी निर्यातीचे परवाने दिले आहेत. हिंदी कापडाच्या बाजारपेठेंत कापडाला येणारा भाव पाकिस्तानाला परवडत नसल्यानें अधिक निर्यातीचे परवाने देण्यांत आले नाहींत असें समजतें.

**ग्वाल्हेर संस्थानांत लष्करी शिक्षण**—ग्वाल्हेर सरकारनें विद्यार्थी व शिक्षक ह्या सर्वांना लष्करी शिक्षण देण्याचें ठरविलें आहे. शिक्षणासाठी उन्हाळ्यांत वर्ग काढण्यांत येणार आहेत. रायफल्स, हातबाँब व तोफखाना ह्यांचें शिक्षण देण्यांत येईल.

**मद्रासमधील मोटार वहातूक**—मद्रास सरकारनें मोटार वाहतुकीच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण करण्याचें ठरविलें असलें तरी पुढील चार-पांच वर्षांत सर्वच्या सर्व कार्यक्रम पुरा करतां येणार नाहीं, असे उद्गार मद्रास प्रांताच्या एका मंत्र्यानें नुकतेच काढले.

**निर्वासितांना कामधंदा**—पूर्व पंजाब सरकारला घरें बांधण्यासाठी व धरणाचीं कामें करण्यासाठी १ लाख मजुरांची जरूरी आहे. नोकरी पाहून देणाऱ्या सरकारी संस्थेकडे पूर्व पंजाब सरकारनें तशी मागणीहि केली आहे. पूर्व पंजाबांतील धडधाकट निर्वासितांनीं वरील कामावर जावें म्हणून सरकार त्यांचें मन वळवीत आहे.

**गुळाच्या निर्यातीची परवानगी**—हिंदुस्थानांतून गूळ परदेशीं पाठविण्याला हिंदुस्थान सरकारनें परवानगी दिली आहे. गुळाच्या निर्यातीला आतां परवान्याची गरज लागणार नाहीं. गुळाची मळी निर्यात करण्यास परवानगी नाहीं.

**जागतिक बँकेकडून कर्जें**—जागतिक बँकेकडून कर्ज मिळावें म्हणून १६ राष्ट्रांनीं त्या बँकेकडे अर्ज केले आहेत. त्यांत चार कम्युनिस्ट मताचीं राष्ट्रेंहि आहेत. इंग्लंड, झेकोस्लोव्हाकिआ, पोलंड आणि युगोस्लाव्हिआ, ह्यांनीं मिळून १ कोटी, ७० लाख डॉलर्सचें कर्ज मागितलें आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती — गरम — रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, हमदेरे बोळाजवळ, पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. २ जून १९४८



संस्थापक

प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## हिंदी कपाशीच्या पुरवठ्याचें पृथःकरण

श्री. आर. जी. सरय्या, ओ. बी. ई., ह्यांचें वरील विषयावर मुंबईच्या रोटरी क्लबांत नुकतेंच भाषण झालें. कैरो येथील आंतरराष्ट्रीय कपास परिषदेच्या हिंदी प्रतिनिधि मंडळाचें नेतृत्त्व श्री. सरय्या ह्यांचेकडे होतें, ह्या एकाच गोष्टीवरून त्यांचा ह्या विषयावरील अधिकार स्पष्ट होईल. इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीचे ते उपाध्यक्षहि आहेत. त्यांच्या भाषणाच्या विषयाचें महत्त्व ध्यानीं घेतां, त्याचा जरा विस्तारानें परामर्श घेणें अगत्याचें आहे.

श्री. सरय्या ह्यांनीं आपल्या भाषणांत प्रथम जागतिक पार्श्व-भूमि वर्णन करून सांगितली. कपाशीचें चालू मोसमांतील जागतिक उत्पादन २५० लक्ष गाठी, म्हणजे १९४६–४७ मधील उत्पादनापेक्षा १६% ज्यास्त परंतु १९३८–३९ मधील उत्पादनापेक्षा १५% कमी आहे. जागतिक उठाव मात्र २८० लक्ष गाठी, म्हणजे सुमारें गेल्या वर्षी इतकाच परंतु १९३८–३९ मधील उठावापेक्षा २० लक्ष गाठी कमी आहे. ह्याचा सरळ अर्थ, जगाचा कापडाचा संसार सांठलेल्या कपाशीवर चालू आहे आणि हा सांठा तर कमी होत चालला आहे. १९४५ अखेर २८० लक्ष गाठींचा, म्हणजे एका वर्षाच्या खपाइतका, कपाशीचा सांठा होता. तो १९४६ अखेर १४० लक्ष गाठींवर, म्हणजे सहा महिन्याच्या खपाइतका, येईल असा श्री. सरय्या ह्यांचा अंदाज आहे. अमेरिकन कपाशीची १९३८-३९ मध्यें किंमत पौंडास ९ सेंट होती, ती १९४५-४६ मध्यें २६.६८ सेंट झाली व चालू वर्षी तर ती ४० सेंटवर गेली आहे! इजिप्त हा देश लांब धाग्याच्या कपाशीसाठी प्रसिद्ध आहे. तेथील कपाशीचें उत्पादन १९३७ सालीं १५ लक्ष गाठी (७२० पौंडाच्या) होतें. तें १९४३ मध्यें ५ लक्ष गाठींवर आलें परंतु १९४६ मध्यें तें वाढून ८½ लक्ष गाठी झालें. युद्धकालीन अडचणींच्या परिस्थितीमुळें इजिप्शन कपाशीच्या उठावासाठी सरकारी उपाययोजना करावी लागली आणि सरकारी पाठिंब्यामुळें प्रथम, व नंतर चलन विस्तारामुळें इजिप्शन कपासहि गेल्या दोन वर्षांत चांगलीच महागली.

युद्धपूर्व हिंदी परिस्थिति खालीलप्रमाणें होती:–

| | | | |
|---|---|---|---|
| | उत्पादनक्षेत्र: | २,३४,९०,००० | एकर |
| १९३८-३९ | पीक: | ५०,५१,००० | गाठी |
| | हिंदी गिरण्यांत उठाव: | ३१,५१,००० | गाठी |
| | निर्गत: | २७,०३,००० | गाठी |

१९३८-३९ च्या प्रारंभीं गिरण्यांकडे व व्यापाऱ्यांकडे २४ लक्ष गाठी कपास शिल्लक होती. ती गेल्या मोसमाचे अखेरीस १८ लक्ष गाठींवर आली. आपल्या निर्गतीपैकी ३८% जपानकडे व १२% ग्रेट ब्रिटनकडे जात असे. युद्धकाळांत ग्रेट ब्रिटन व ऑस्ट्रेलिया ह्या वगळून बाकी सर्व निर्गत-बाजारपेठांस हिंदुस्थान मुकला. हिंदी गिरण्यांतील उठाव वाढून तो ४० लक्ष गाठींवर गेला तरी नष्ट झालेल्या बाजारपेठेमुळें पडणारी तूट तो भरून काढूं शकला नाहीं. अशा रीतीनें १९४४ व १९४५ मध्यें शिलकी कपाशीच्या गाठी ४७ लक्षांवर झाल्या. "अधिक धान्य पिकवा" मोहिमेमुळें कपाशीखालील क्षेत्र १९४२-४३ मध्यें २४० लक्ष एकरांचें १९९ लक्ष एकरांवर आलें आणि १९४६-४७ मध्यें तर तें १४९ लक्ष एकर झालें. युद्धापूर्वी वार्षिक उत्पादन ५० ते ६० लक्ष गाठी होई, १९४६–४७ मध्यें तें ३५ लक्ष गाठी झालें व आतां तें ४० लक्ष गाठींच्या आसपास आहे. १९४५ सालीं युद्ध संपलें तरी अन्नपरिस्थिति अद्याप बिकट आहे आणि त्यामुळें कपाशीचें उत्पादन वाढूं शकलें नाहीं.

युद्धसमाप्तीनंतर कपाशीच्या निर्गतीस हळुहळू प्रारंभ झाला. परंतु लागवडीच्या क्षेत्रावरील बंधनें कायम राहिलीं. त्या कारणानें १९४७ अखेर असलेला ३३ लक्ष गाठी हिंदी कपाशीचा सांठा १९४८ अखेर २० लक्ष गाठींवर येईल अशी श्री. सरय्या ह्यांची अपेक्षा आहे. १५ ऑगस्ट रोजीं हिंदुस्थान व पाकिस्तान अशीं दोन स्वतंत्र राष्ट्रें निर्माण झालीं. पाकिस्तानच्या निर्मितीमुळें सिंध व पश्चिम पंजाब हे कपाशीच्या लागवडीचे महत्त्वाचे प्रदेश पाकिस्तानी बनले. १९४७–४८ च्या पिकाची वाटणी खालीलप्रमाणें आहे:–

| | क्षेत्र ( एकर ) | उत्पादन ( गाठी ) |
|---|---|---|
| पाकिस्तान | ४१ लक्ष | १३ लक्ष (त्यापैकीं, फाळणीनिर्मित बंडाळीमुळें फक्त १० लक्ष गाठीच मिळतील) |
| हिंदुस्थान | ११४ लक्ष | २६ लक्ष |

पाकिस्ताननिर्मित १० लक्ष गाठी कपास हिंदी गिरण्यांत खपत असे; परंतु पाकिस्तानी कपास हिंदुस्थानाकडे न येता इतर देशांकडे आकर्षिली जात आहे आणि पाकिस्तानांतील फक्त ४ लक्ष गाठी कपास हिंदुस्थानांत येऊन पोंचेल असें वाटतें. कपाशीच्या पुरवठ्याच्या सद्यःस्थितीचें चित्र खालीलप्रमाणें श्री. सरय्या ह्यांनीं काढलें आहे:—

| कपास | लक्ष गाठी | कपास | लक्ष गाठी |
|---|---|---|---|
| पूर्वीची शिलक | ३३ | गिरण्यांत उठाव | ३२ |
| उत्पादन | २७ | निर्गत | ८.८ |
| पाकिस्तानांतून आयात | ४ | गिरण्यांबाहेर उठाव | २.७ |
| एकूण पुरवठा | ६४ | एकूण उठाव | ४३.५ |

म्हणजे, फक्त २०½ लक्ष गाठी कपास उरते. ह्यांतच गिरण्यांजवळील साठ्याचा समावेश आहे. ह्या परिस्थितीवर श्री. सरय्या ह्यांनीं उपाययोजना सुचविली आहे, ती म्हणजे हिंदुस्थान–पाकिस्तान खुला व्यापार ही होय. दोन्ही देशांतील जकाती कपाशीची व कापडाची किंमत वाढविण्यास कारणीभूत होत आहेत. उदाहरणार्थ, पाकिस्तानांतून निर्गत होणाऱ्या कपाशीच्या प्रत्येक खंडीस १२० रु. जकात पडते व हिंदी कापडाच्या निर्गतीस २५% जकात भरावी लागते. खुल्या व्यापाराबरोबर कपाशीचें क्षेत्रहि वाढलें पाहिजे. आणखी ४० लक्ष एकरांत कपास लावण्यांत यावी अशी श्री. सरय्या ह्यांची सूचना आहे. कपाशीचें दरएकरीं उत्पादन वाढविण्याचें, तिचा दर्जा सुधारण्याचें व संशोधनाचें महत्त्वही त्यांनीं प्रतिपादन केलें आहे.

## भोर स्टेट बँक लि., भोर

### पुणें शहर शाखेचें उद्घाटन व पानसुपारी

भोर स्टेट बँक लि. च्या पुणें शहर शाखेचें उद्घाटन शनिवार, २९ मे रोजीं सायंकाळीं ५१५, बुधवार पेठ, श्री. मोटे ह्यांचा वाडा, येथें भोरचे राजेसाहेब सर आर. एस. पंतसचिव, ह्यांचे हस्तें झालें. राजेसाहेबांनीं आपल्या नांवाचें खातेंहि उघडून बँकेच्या शाखेच्या कामास शुभ प्रारंभ करून दिला आणि त्यांचें अनुकरण निमंत्रितांपैकी कित्येकांनीं केलें. श्री. काकासाहेब शिंगरे प्रभृति बँकेची डायरेक्टर मंडळी पाहुण्यांचें स्वागत करीत होती, आणि त्यांनीं समारंभाची व्यवस्था उत्कृष्ट ठेवली होती. पानसुपारीस पुण्यांतील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी व कारखानदार उपस्थित होते.

बँकेनें अल्पावधींत, म्हणजे केवळ ३½ वर्षांत, केलेल्या प्रगतीचा उल्लेख आम्हीं वेळोवेळ केलेलाच आहे. पुणें शाखा ही बँकेची तिसरी शाखा होय. बँकेचें खेळतें भांडवल १८ लक्ष रु. असून तिचा रिझर्व्ह फंड ८,००० रु. आहे. शिवाय, कर्जरोख्यांतील घसाऱ्याइतकी रकम (१०,३४३ रु) इ. फ. रिझर्व्ह म्हणून निराळी काढलेली आहे आणि इन्व्हेस्टमेंट रिझर्व्ह फंड म्हणून ४८,२७३ रु. चा स्वतंत्र फंड आहे, तो वेगळाच. ४% डिव्हिडंड ती देत आहे. आपलें वसूल भांडवल १½ लक्ष रु. च २½ लक्ष रु. करण्याचा बँकेचा विचार आहे आणि बँकेची पुण्यांत स्वतःची इमारतहि लौकरच होण्याचा संभव आहे बँकेनें भोर येथें सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे. पुणें येथील शाखेमुळें बँकेच्या लौकिकांत व उपयुक्ततेंत भर पडणार आहे, ह्यांत संशय नाहीं.

---

**कागद नियंत्रण रहाणार, परंतु किंमतींत वाढ**—कागदावरील नियंत्रण काढण्याजोगी आजची परिस्थिति नाहीं, असें सरकारनें जाहीर केलें आहे. हिंदी गिरण्या एक सारखी किंमत वाढ मागींत आहेत. हा प्रश्न टारिफ बोर्डाकडे सोपविण्यांत येईल; तूर्त १ जून पासून पौंडास सुमारें दीड आणा वाढ करण्यास सरकारनें मान्यता दिली आहे.

---

### कूळ कायदा *

लॉ ॲकॅडेमीनें कूळ कायद्याच्या पुस्तकाची ही तिसरी आवृत्ति एका वर्षाचे आंत प्रसिद्ध केली आहे. पहिल्या दोन आवृत्त्यांच्या खपावरून, पुस्तकानें कूळ कायद्याचें स्वरूप जनतेस समजावून सांगण्याचे कामीं किती उपयुक्त व महत्त्वाचें काम केलें आहे, हें दिसून येईल. पहिल्या दोन आवृत्त्यांचे वेळीं कायद्याची अंमलबजावणी नुकतीच चालू झाली होती. त्या कारणानें त्यांमध्यें तात्त्विक चर्चेपलीकडे अधिक लक्ष देतां आलें नाहीं. आतां मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणीचें स्वरूप लक्षांत आलें असल्यामुळें प्रस्तुत आवृत्तींत त्याचा उपयोग करण्यांत आला आहे आणि त्या दृष्टीनें ही आवृत्ति जास्त उपयुक्त झाली आहे. परिशिष्ट म्हणून १९३९ चा कूळ कायदा इंग्रजींत समग्र देण्यांत आला आहे. जनतेच्या निकडीच्या हितसंबंधांशीं निगडित असलेल्या, नव्या कायद्यांचें विवरण करणारीं पुस्तकें तात्काळ उपलब्ध करून देण्यांत लॉ ॲकॅडेमीनें चांगलें यश मिळविलें आहे. "जमिनींच्या तुकडे एकत्रीकरणाचा कायद्याहि" हें पुस्तकहि लवकरच बाहेर पडेल, असें समजतें.

---

* तयार करणारः लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २. तिसरी आवृत्ती. पृ. सं. १४०+५६. किं. ३ रु.

## नफ्यांत कामगारांना हिस्सा कसा द्यावा?

(पुरेसें भांडवल गुंतविलें जाण्यास निरुत्साह वाटूं नये, ह्या दृष्टीनें 'योग्य व्याज' ठरविलें जावयाचें आहे.)

हिंदुस्थान सरकारनें ६ एप्रिल, १९४८ रोजीं आपलें औद्योगिक धोरण जाहीर केलें, त्यास अनुसरून एक मध्यवर्ती सल्लागार कौन्सिल नेमण्यांत यावयाचें आहे.

(१) कामगारांस योग्य वेतन, (२) उद्योगधंद्यांत गुंतलेल्या भांडवलावर योग्य व्याज, (३) धंदा चालू ठेवण्यासाठी व वाढविण्यासाठी योग्य रिझर्व्ह, (४) नफ्यामधील कामगारांचा वाटा, इत्यादि बाबत ह्या कौन्सिलनें सरकारास सल्ला द्यावयाचा आहे. ह्यांपैकी २,३ व ४ हे प्रश्न अवघड असल्याकारणानें त्यांचा आगाऊ प्राथमिक विचार करण्यासाठीं सरकारनें एक तज्ज्ञ कमिटी नेमली आहे. तिचा रिपोर्ट मध्यवर्ती सल्लागार कौन्सिलला अखेरच्या रिपोर्टासाठी मार्गदर्शक होईल. तज्ज्ञ कमिटीपुढें खालील महत्त्वाचे प्रश्न विचारार्थ आहेत:—

(१) "उद्योगधंद्यांत गुंतलेलें भांडवल" कसें ठरवावयाचें? (२) भांडवल, वेतन व रिझर्व्ह ह्यांत नफ्याची वाटणी करण्यापूर्वी हा नफा ठरवितांना घसारा व कर ह्यांचा हिशेब कसा करावा? (३) रिझर्व्ह कोणत्या कारणासाठी काढतां यावा? रिझर्व्हची रकम किती असावी? (४) उद्योगधंद्यांत गुंतलेल्या भांडवलावर किती व्याज योग्य ठरवावें? हा दर सर्व धंद्यांस सारखाच असावा काय? कांहीं वर्षेपर्यंत उद्योगधंद्यांतील भांडवलावर योग्य व्याज सुटलें नाहीं, तर तें मागाहून मिळण्याची तरतूद असावी काय? (५) कराच्या दराप्रमाणें योग्य व्याज कमी-जास्त व्हावें काय? (६) भांडवलावर योग्य व्याज व रिझर्व्ह ह्यांची तरतूद केल्यावर, उरलेल्या नफ्यांत कामगारांचा हिस्सा किती असावा? (७) नफ्याची ही वाटणी दरसाल व्हावी, का त्यांतला कांहीं भाग रिझर्व्ह राखावा? (८) कामगारांच्या नफ्यांतील हिस्सा प्रत्येक कारखान्यानें स्वतंत्रपणें देऊन टाकावा, का विशिष्ट प्रदेशांतील सर्व उद्योगधंद्यांनीं मिळून तो द्यावा? (९) ह्या संबंधांत सरकारी मालकीच्या धंद्यांचें स्थान काय? (१०) सरकार अखेर जाहीर करील त्या तत्त्वांवर योग्य व्याज इ. ठरविण्यासाठी योजना काय असावी? (११) वरील सर्व गोष्टींचा विचार केला असता, नफ्यांत कामगारांना हिस्सा देणें अव्यवहार्य दिसलें, तर सरकारी धोरण अमलांत आणण्याचे दृष्टीनें दुसरी एखादी कांहीं योजना सुचविता येईल काय?

---

**सहकारी सोसायट्यांमार्फत कापडविक्री** — मुंबईमधील गिरण्यांच्या उत्पादनापैकी २५% कापड त्यांना बाजूस राखावयास लावून तें मुंबईमधील कंझ्युमर्स को. सोसायट्यांना विक्रीसाठी देण्याची योजना आखली जात आहे.

**अमेरिकेकडे ब्रिटिश सोनें**—ग्रेट ब्रिटननें, ५ मे १९४८ अखेर संपलेल्या आठवड्यांत अमेरिकेकडे सुमारें २४ कोटी रुपये किंमतीचें २०½ लक्ष औंस सोनें पाठविलें.

**यंत्रें वाढलीं, जनावरें कमी झालीं**—अमेरिकेंत शेतीसाठी यंत्रसामुग्रीचा उपयोग झपाट्यानें वाढत आहे. १९३५–३९ मधील सरासरीच मानानें १९४७ मध्यें १२५% जास्त ट्रॅक्टर्स, ७८% जास्त मोटार ट्रक्स आणि ११९% जास्त इतर मशिनरी वापरण्यांत आली. शेतांत राबणाऱ्या जनावरांची संख्या ३९% कमी झाली.

## सोन्याचा भाव केव्हां उतरेल ?

( मा. म. काळे )

सोन्याचा उपयोग सध्यां प्रत्यक्ष चलनाला विशेषसा होत नसला तरी आंतरराष्ट्रीय व्यापारांतील तफावत अजूनहि सोन्याच्या रूपानेंच फेडली जाते. चलनव्यवस्थेंतील सुधारणेचा परिणाम इतकाच झाला कीं अंतर्गत व्यवहारासाठी कागदी चलनाचा उपयोग चालूं शकतो परंतु परराष्ट्रांमधील देण्याघेण्याच्या व्यवहारांना आजहि सोनेंच उपयोगी पडूं शकतें. सोन्याचा जागतिक सांठा सर्वांत जास्त अमेरिकेजवळ आहे त्यामुळें आज युद्धोत्तर बिकट आर्थिक परिस्थितींतहि एकटी अमेरिका आपल्या सुवर्णसंचयाच्या आधारावर रशियाव्यतिरिक्त इतर देशांतील आर्थिक परिस्थिति स्वत:च्या आटोक्यांत किंवा अधिकारक्षेत्रांत आणूं शकत आहे. सोन्याचें आंतरराष्ट्रीय व्यापारांतील महत्त्व अबाधित असेपर्यंत अमेरिकेचें हें महत्त्व कायमच राहील. सोन्याव्यतिरिक्त इतर पदार्थ सोन्याची भूमिका प्राप्त करून घेऊं शकेल असा संभव दिसत नाहीं. १९३५ पासून अमेरिकेनें सोन्याचा भाव दर औंसास ३५ डॉलर असा निश्चित ठरवून दिला आहे व अधिकृत रीत्या सोन्याची विक्री याच भावांत होऊं शकते. परंतु युद्ध–काळांत व नंतर निर्माण झालेल्या चलनविस्तारामुळें व उत्पादनावर पडलेल्या दडपणामुळें, सोन्याचा हा अधिकृत भाव प्रत्यक्ष व्यवहारांत कोठेंच टिकून राहूं शकत नाहीं, व भाव नियंत्रण चालू असतांहि ज्याप्रमाणें भावनियंत्रित वस्तू काळ्या बाजारांत भरमसाठ भावानें विकल्या जातात तीच गोष्ट सोन्याच्या बाबतींत झाली आहे. हिंदुस्थानांतहि युद्ध सुरू झाल्यावर व युद्धोत्तर काळांतहि सोन्याचा भाव सारखा वाढत चालला आहे, व गेल्या कांहीं दिवसांत तर त्यानें उच्चांक गांठला आहे. याचें कारण हेंच असावें कीं गरजांच्या मानानें उत्पादनावर दडपण पडल्यामुळें सर्वत्र टंचाई भासूं लागली व अन्नधान्य व इतर यंत्रसामुग्री इ. आवश्यक माल परदेशांतून आणावयाचा झाला तर आपल्या परराष्ट्रीय व्यापारांत अनुकूल तफावत शिल्लक रहात नसल्यामुळें व उलट गेलीं एक दोन वर्षें प्रतिकूल तफावत दिसून येत असल्यामुळें देण्याचे व्यवहार शेवटीं सोन्याच्या रूपानेंच भागवावे लागतात. या परिस्थितीच्या दडपणामुळें आपल्या देशांतील सोन्याचा भाव सारखा वाढत चालला आहे. ही परिस्थिति, आपल्या परराष्ट्रीय व्यापारांत अनुकूल तफावत येत चालल्यावर थोडीशी सुधारूं शकेल.

सोन्याचा उपयोग करणें म्हणजे संपत्ति 'निरुपयोगी करून संचित करण्याप्रमाणें आहे, किंवा दागदागिन्यासाठी सोनें वापरल्यानें प्रत्यक्ष संपत्तीचा दुरुपयोगच होतो अशी एक विचारसरणी असली तरी अजूनहि पैसा किंवा संपत्ति दिग्दर्शित करण्याचें कांहीं वेळा तरी एकमेव साधन म्हणजे सोनें हेंच समजलें जातें. सोन्याच्या दुर्मिळतेमुळें हें असाधारण महत्त्व सोन्याला प्राप्त झालें आहे; व जोंपर्यंत आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यांतील व्यवहार एखाद्या जागतिक संस्थेनें मान्य केलेल्या चलनी नोटांच्या आधारावर चालत नाहींत, तोंपर्यंत सोन्याचें महत्त्व कायमच राहाणें संभवनीय दिसतें. किंवा, आंतरराष्ट्रीय व्यापार अनेक राष्ट्रांमध्यें देवाणघेवाण स्वरूपाचा, म्हणजेच बार्टर पद्धतीचा किंवा अदलाबदलीच्या स्वरूपाचा चालला तरच सोन्याचें महत्त्व कमी होणें संभवनीय आहे. आंतरराष्ट्रीय जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय चलननिधि ह्या बाबतींत सत्वर कांहीं सुधारणा करूं शकतील तर सोन्याचा कडाडलेला भाव उतरूं शकेल. चलनपद्धतींतील सुधारणा जागतिक स्वरूपाच्या म्हणजे जगांतील सर्व देशांना मान्य होणाऱ्या असतील तरच सर्व जगाचे व्यवहार कागदी चलनावर आधारले जाऊन, सोन्याचा वाढलेला भाव कमी होऊं शकेल.

सोन्याची टंचाई भासण्याचें व भाव कडाडण्याचें आणखी एक कारण म्हणजे युद्ध काळांत व नंतरहि सोन्याचें उत्पादन कमी प्रमाणांत झालें व अमेरिकेनें ठरवून दिलेल्या मर्यादित भावांत सोनें उत्पादन करून विकणें खाणीवाल्यांना परवडेनासें झालें. यामुळेंहि सोन्याचा सांठा व मागणी यांवर दडपण येऊं लागलें.

आणखी कांहीं वर्षांनीं कदाचित मंदी झाल्यास सोन्याचा भाव उतरूं शकेल. उत्पादन वाढून कोणत्याहि देशांतल्या अंतर्गत गरजा भागविल्या जाऊं लागल्या, उद्योगप्रधान देशांनीं यंत्रसामुग्री इ. चें उत्पादन वाढविलें, कांहीं वर्षें शांतता नांदली म्हणजे परराष्ट्रीय व्यापारी देणीं फेडण्याचे व्यवहार जास्त सोपे होतील व शक्य तर्थे मालाच्या रूपांतच देणीं फेडलीं गेल्यामुळें सोन्याची आजच्या प्रमाणें आवश्यकता भासणार नाहीं व बाजारभाव उतरूं शकेल. परंतु तो उतरण्यासाठी जागतिक शांतता, सुव्यवस्थित परराष्ट्रीय व्यापार व प्रत्येक देशांतील कृषिविषयक, खनिज व औद्योगिक उत्पादनाची वाढ यांची फार आवश्यकता आहे. अंतिम पृथक्करणांत, आर्थिक व्यवहारांचें मुख्य स्वरूप, गरजा भागविणें हेंच आहे. सध्यां जागतिक उत्पादनांत समतोलपणा राहिलेला नाहीं. अमेरिका, कॅनडा, ब्रिटन, अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया इ. देशांत उत्पादन वाढत आहे परंतु बाकी बहुतेक देशांत तें घटत असल्यामुळें, जागतिक बाजारपेठ दुर्मिळतेच्या दडपणाखाली भरडून निघत असल्यामुळें, आपल्यासारख्या सोन्याची टंचाई असलेल्या देशांत सोन्याच्या भावानें उत्पादन-परिस्थितीच्या दडपणामुळें देशांत उच्चांक गाठणें सहाजिक आहे. परंतु, ही स्थिति कायम टिकणारी नव्हे.

---

### दि बँक ऑफ कराड, लि.

१२ मार्च, १९४६ रोजीं कराड येथें स्थापन झालेल्या वरील बँकेनें अल्पावधींत चांगली प्रगति केली आहे. ३१ डिसेंबर, १९४७ अखेरच्या तिच्या ताळेबंदाप्रमाणें, तिचें वसूल भांडवल १,२५,००० रु. असून रिझर्व्ह फंड १,००० रु. चा आहे आणि तिचेकडे १५३/४ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. ठेवींपैकी निम्म्यापेक्षा अधिक मुदती आहेत आणि एक तृतीयांशापेक्षा कमी चालू खात्यावरील आहेत. बँकेनें २ लक्ष, ९० हजार रु. रोख व इतर बँकांत चालू खात्यावर ठेवले असून ४ लक्ष, ४५ हजार रु.चे तिचेजवळ सरकारी रोखे आहेत. १०३/४ लाखांचीं कर्जें दिलेलीं आहेत. अहवालाचे वर्षांत बँकेनें व्याज व कमिशन मिळून ८१,२७३ रु. मिळवले व ५०,४६३ रु. दिले. निव्वळ नफा २०,२५० रु. उरला. त्यांतून ५,००० रु. रिझर्व्ह फंडांत टाकले, ४ % करमाफ डिव्हिडंडला ५,००० रु. लागले, इनकम टॅक्ससाठी ८,५०० रु. ची तरतूद केली व १,७५१ रु. पुढील हिशेबांत ओढले. श्री. ल. म. देशपांडे हे बँकेचे चेअरमन असून डायरेक्टर मंडळींत सदर्न मिटिंगचे चेअरमन शेठ द्वा. ह. बलारिया, श्री. शंकरराव आगटे, श्री. विष्णुपंत वेलणकर, श्री. पांडूअण्णा शिराळकर इत्यादि सुप्रसिद्ध व अनुभवी मंडळी आहेत. श्री. विष्णुपंत शिराळकर हे मॅनेजिंग डायरेक्टर असून श्री. म. वि. खंडकर हे मॅनेजर आहेत अशा प्रकारें, उत्कृष्ट डायरेक्टर बोर्डाचे देखरेखीखाली व्यवस्थापकांनीं गेल्या वर्षी किफायतशीर व्यवहार करून बँकेच्या प्रगतीचा पाया घातला आहे.

## पडीक जमीन लागवडी जोगी करण्याचें अगत्य

### हिंदुस्थानाच्या अन्नपुरवठा वाढविण्याच्या योजना

हिंदुस्थान सरकारनें १९४७ च्या सप्टेंबरमध्यें फूड ग्रेन्स पॉलिसी कमिटी नेमली; येत्या पांच वर्षांत विवक्षित अन्न पुरवठा वाढविण्याबाबत सूचना करण्याचें काम तिचेकडे होतें. डिसेंबर, १९४७ मध्यें, कमिटीच्या नियंत्रणें क्रमशः उठविण्याच्या मुख्य सूचनेस प्रसिद्धी देण्यांत आली. आतां कमिटीचा सबंध अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला. त्याचा सारांश खाली दिला आहे.

( १ ) १९४३–४७ मधील ' अधिक धान्य पिकवा ' मोहीम अपेक्षेप्रमाणें यशस्वी झाली नाहीं.

( २ ) नियंत्रणें चालू होतीं, तेथें ज्या प्रमाणांत कपास व ताग ह्यांची लागवड कमी झाली त्या प्रमाणांत धान्याचीं पिकें वाढलीं नाहींत.

( ३ ) सध्याचें उत्पादन लोकसंख्येच्या गरजेच्या मानानें अपुरें आहे. दर तीन वर्षांत एकदां तरी उत्पादनांत मोठी तफावत पडते; कांहीं तर कायमचे दुष्काळी विभाग आहेत. अनेकविध उपयोगाचीं मोठीं धरणें बांधून जमिनीचें पावसावरील अवलंबन कमी केलें पाहिजे. मुंबई सरकारच्या दुर्जल शेतीचा व बंधाऱ्यांचा उपक्रम इतर प्रांतांनीं हातीं घेण्याजोगा आहे. पडीक जमीन तशी राहूं देणें घातुक आहे.

( ४ ) शेती सुधारणा ही मुख्यतः प्रांतिक सरकारांच्याच कक्षेंतील बाब आहे; परंतु पडीक जमीन लागवडीस उपयोगी करण्याचें प्रचंड काम मध्यवर्ती सरकारनेंच हातीं घ्यावें.

( ५ ) ( अ ) सेंट्रल बोर्ड ऑफ ॲग्रिकल्चरल प्लॅनिंग व ( ब ) प्रत्येक प्रांतासाठी स्वतंत्र बोर्ड ऑफ ॲग्रिकल्चर अशीं बोर्डें स्थापण्यांत यावींत.

( ६ ) सेंट्रल बोर्डानें मंजूर केलेल्या योजना अंमलांत आण ण्यासाठी एक सेंट्रल लँड रिक्लमेशन संघटना स्थापन करावी; तिला मध्यवर्ती सरकारनें ५० कोटी रु. भांडवल द्यावें; ७ डायरेक्टरांनीं तिचा कारभार पाहावा; तिनें पडीक जमीन लागवडीस योग्य करून प्रांतिक बोर्ड ऑफ ॲग्रिकल्चरचे स्वाधीन करावी; प्रत्येक योजनेचा खर्च त्या त्या प्रांताकडून २० हप्त्यांत वसूल करावा; किमान १०,००० एकरांच्या गटानें हें काम हातीं घेण्यांत यावें; त्याची वाटणी करतांना २०० एकरांपेक्षा लहान तुकडे पाडूं नयेत. ( यांत्रिक शेतीस एवढें तरी सांघिक क्षेत्र हवें )

( ७ ) बटाटे, रताळी, केळी, ह्यांची लागवड वाढवावी; परंतु सध्या ज्यांत मुख्य अन्नधान्यें लावलीं जातात त्यांत मात्र नव्हे. मच्छीमारीच्या धंद्यास प्राधान्य द्यावें.

( ८ ) अन्नधान्यासाठी परदेशांवरील अवलंबन त्वरित थांबविण्यांत यावें. १० लक्ष टनांचा मध्यवर्ती साठा सरकारनें निर्माण करून ठेवावा. सरकार जें धान्य आयात करतें, त्याची व्यवस्था पहाण्यासाठी स्वतंत्र संघटना निर्माण करण्याच्या आवश्यकते-बाबत चौकशी व विचार करण्यांत यावा.

( ९ ) नव्या धरणांच्या योजनांमुळें उत्पादनांत ४७ लक्ष टनांची भर पडेल. उत्पादन वाढीच्या कार्यक्रमांमुळें येत्या पांच वर्षांत ३० लक्ष टनांची उत्पादनांत वाढ होईल. तफावत पडणाऱ्या ३० लक्ष टनांचें उत्पादन पडीक जमीन लागवडीस आणूनच होऊं शकेल.

( १० ) कमिटीचे एक सभासद डॉ. राव, ह्यांच्या मतें पडीक जमीन लागवडीखाली आणल्यानें येत्या पांच वर्षांत उत्पादन फारसें वाढणार नाहीं, कारण त्यांत अडचणी फार आहेत. सध्या लागवडीखाली असलेली जमीनच लागवडीस अधिक लायक करणें ज्यास्त फलदायी होईल आणि मध्यवर्ती लँड रिक्लमेशन संघटनेची आवश्यकताच उरणार नाहीं. लागवडीखालील जमिनींचेंच उत्पादन वाढविणें लवकर शक्य होईल.

## जमात आणि सामाजिक प्रश्न

### ग्रामीण न्यायमंडळ व सामाजिक प्रश्न

( २ )

(तारीख ११ मे १९४८ रोजीं मुंबई नभोवाणीवर श्री. यशवंत दत्तात्रय खोले पुणें यांनीं केलेलें भाषण, रेडिओ अधिकाऱ्यांच्या कृपेनें उद्धृत केलें आहे.)

#### गांव सभेची घटना

प्राचीन काळापासून बऱ्याच काळपर्यंत खेडेगांवांतून गांवसभा अस्तित्वांत असत. या ग्रामसभा म्हणजे हल्लींच्या ग्रामपंचायती अगर न्यायदान मंडळें नाहींत. कांहीं निवडक लोक याचे सभासद असत. गांवातील अेकंदर सर्व कारभारावर यांची देखरेख असे. पतपेढ्यांचा व्यवहार, धर्मादाय, गांवांतील सार्वजनिक बांधकामें, गांवांतील तंटे व देवस्थानाची कामें वगैरेवर देखरेख ठेवण्याचें काम त्यांजकडे असे. इतिहासाकडे पाहिलें असतां असें दिसतें कीं, गांवचे पाटलांस दंड करणेचा अधिकार असे. अेका गांवांत एका स्त्रीनें भांडणास प्रोत्साहन दिल्याचे आरोपावरून तिजला दंडाची शिक्षा दिल्याचा उल्लेख सांपडतो. पेशवेकालीन न्यायदानाचें काम ग्रामपंचायतीकडे असल्याचा उल्लेख सांपडतो. या गांवसभांच्या घटनेबद्दल अगर त्यांचे अधिकाराबद्दल कोठेंच उल्लेख नाहीं. अेवढें खरें कीं गांवकरी लोकांना गांवचे कारभारांत बऱ्याच अंशानें भाग घेता येत असे. शिवाजीच्या काळांत अशा तऱ्हेची पद्धत अस्तित्वांत असल्याचा उल्लेख सांपडत नाहीं. या काळीं मुख्यतः गांवची सर्व व्यवस्था गांवचा पाटील पहात असे व विशिष्ट कारणीं अगर महत्त्वाचे कामाबाबत सभा बोलावून विचारविनिमय करून वागत असे. त्यास गांवचे लोकांचे मनाविरुद्ध कोणतीच गोष्ट करणें शक्य नव्हतें. गांवचा पाटील हा सरकारी नोकर या भावनेपेक्षा लोकपुढारी म्हणूनच वागत असे. यावरून लोक स्वायत्तता भोगीत असत असें म्हणण्यास हरकत नाहीं. ब्रिटिश अमदानींत या गांवसभा जरी बेकायदेशीर म्हणून समजल्या गेल्या नाहींत तरी अेकंदर राज्यकारभाराचे धोरणावरून त्या नाशास पावतील असें दिसलें. ब्रिटिशांचें प्रथमचेंच धोरण सर्व सत्ता केंद्रित करण्याचें होतें व यामुळे खेडेगांवांतील जनतेला आपला कारभार मनाप्रमाणें करण्यास स्थान नव्हतें.

#### पंचायती

गांवसभेखेरीज आपल्याकडे कांहीं भागांत समाजाच्या परिस्थितीनुरूप व धंद्यानुरूप जमातीची पंचायत असे व त्याकडे जमातीपुरतें न्यायदानाचें काम असे. जात पंचायत ही खेडेगांवच्या ग्रामपंचायतीहून निराळी असे व ज्या ठिकाणीं विशिष्ट समाजाचें वजन असे तेथें जमातीचा पंचायत प्रमुख हाच गांवाचा प्रमुख समजला जाअी.

जमातीच्या पंचायतीची निवड जमातींतील समाजाकडून होत असे व या पंचायतीमध्यें समाजांतील सहा पुढारी असत व यांतील पंचायत प्रमुखास पंच प्रमुख असें समजण्यांत येत असे आणि यामुळें सर्व समाजावर त्याचें वजन असे. या पंचायतीकडे समाजांतील अंतर्गत अशा सर्व प्रश्नांचा विचार करण्याचा अधिकार असे. पंचायतीनें करावयाच्या कामांमध्यें पुढील कामांचा समावेश होत असे. मात्र दोन्ही पक्षांत आपल्या वादाचा निवाडा स्थानिक न्यायाधिकाऱ्याकडून व्हावा असें वाटत असल्यास तो प्रश्न जात पंचायतीकडे जात नसे.

१. धार्मिक प्रश्न २. विवाहासंबंधी. ३ स्थानिक जातरिवाजा-

संबंधीं प्रश्न. ४. वतनें व हक्क. वंशपरंपरागत मिळकत व हक्क. ५. मालमत्तेची वाटणी. ६. पोटगी. ७. जुने गुंतागुंतीचे हिशोब. ८ पन्नास रुपयांपर्यंतच्या मिळकतीचे त्याच गांवांतील दोन रहिवाशांचे तंटे. ९. व्यक्तिविषयक नुकसान अगर दुखापत व हद्दीबद्दलचीं भांडणें. या निकालावर वरिष्ठ अशा पंचायतींकडे अपील करतां येत नसे. परंतु पुढें न्यायदानासाठी कायद्यानें कोर्टें प्रस्थापित झाल्यानें व न्यायदानाचे बाबत नवीन सुधारणा झाल्यामुळें या पंचायतींचें समाजावरील वजन घटत चाललें. तथापि दोन्ही पक्षांची संमती असल्यास अद्यापही लवादामार्फत कांहीं प्रश्नांचा निकाल करण्यांत येतो.

या देशांत खेडेगांवांतील कारभार त्या गांवांतील जनता स्वतः फार कालापासून पहात होती असें म्हणण्यास हरकत नाहीं व ही त्यांची सत्ता त्या वेळचे राज्यकर्त्यांनीं मान्य केल्याचें दिसतें. ठराविक शेतसारा अगर कराचे रूपानें पैसे मध्यवर्ती सत्तेस द्यावयाचे व परचक्रापासून राजाकडून संरक्षण मिळवावयाचें एवढे त्यांचे संबंध असत. खेडेगांवच्या कारभाराच्या दृष्टीनें महत्त्वाची अशी बाब म्हणजे ग्रामपंचायत अगर गांवसभा होत. पंचायत याचा मूळ अर्थ असा दिसतो कीं (प्रथम) पांच लोकांची पंचायत. परंतु केवळ सभेचे पांच सभासद असतच असें नाहीं व आतां केवळ सभासदांच्या संख्येच्या अर्थानें त्यास वैशिष्ट्य नाहीं. परंतु कारभार व न्यायदानासाठी निवडक लोकांची सभा या अर्थानें त्यास संबोधण्यांत येते. खेडेगांव वसवितांना पूर्वी एकाच जमातीचीं बरींच कुटुंबें सामुदाइक रीतीनें वसाहत करीत व त्यामुळें त्यावेळीं गांव पंचायत व जमात पंचायत एकच असल्यामुळें त्या पंचायतीकडून पुष्कळसे सामाजिक प्रश्नही सोडविले जात असत. मागासलेल्या वस्तींचे गांवीं अनेकवेळा सर्व समाजाची सभा घेण्याची प्रथा असे. परंतु जो समाज पुढारलेला असा समजला जात असे अशा समाजाचेबाबत कांहीं निवडक अशा समाज प्रतिनिधींकडून सामाजिक प्रश्नांची चर्चा होऊन तो सोडविला जात असे. पंचायतीच्या निवडीसंबंधीं विशिष्ट असे नियम नसत. लोक एकत्र येत, चर्चा करीत व त्या चर्चेंतून निष्पन्न होणारें मत हेंच सर्वांचें मत धरलें जाई व सर्वांचें मतैक्य आहे असें समजलें जाई. ज्या प्रसंगीं मतभेद असतील अशा गोष्टी कांहीं दुसऱ्या पद्धतीनें सोडविल्या जात असत. ग्रामपंचायत आणि राजा यांचे संबंध फक्त कांहीं ठराविक कर देण्यापुरतेच असत आणि जोपर्यन्त असे कर वेळेवर दिले जात असत तोपर्यन्त राजाकडून स्थानिक कारभारांत ढवळाढवळ केली जात नसे. पंचायतीचे निर्णय हे राजाच्या निर्णयाइतकेच मानले जात, आणि ते न मानणारा इसम हा ग्रामकंटक असा समजण्यांत येई आणि अशा इसमांस देवळांतील धार्मिक विधीस प्रवेश करण्यास बंदी असे. त्यांचे निर्णय हे पूर्ण विचारांतीं व्यवहारास धरून असे दिले जात. दक्षिण हिंदुस्थानांतील एका ग्रामपंचायतीच्या निर्णयाबाबत पुढील माहिती एका लेखकानें दिलेली आहे. मद्रासमधील एका गांवसभेपुढें, एका शाळामास्तरानें एका विद्यार्थ्यास कडक शिक्षा दिली. या त्याच्या गैरवर्तनाबद्दल फिर्याद करण्यांत आली. गांवसभेची सभा मुलाचे आजोबांचे घरीं बोलाविण्यांत आली. गांवसभेमध्यें एकूण २५ गांवकरी सभासद होते. त्यांपैकीं १८ ब्राह्मण व बाकीचे शूद्र होते. सभेची वेळ ३ वाजताची असूनसुद्धा लोक जमण्यास ५ वाजले. फिर्यादीच्या खर्चानें पानतंबाखू व तपकीर जमलेल्या मंडळीस वाटण्यांत आली. मुलाचे आजोबानें घडलेल्या प्रकाराची हकीकत निवेदन केली व पूर्वी केलेल्या १ रुपया दंडाचा शिक्षकावर कांहीं परिणाम झाला नसल्याचें सांगितलें व इतर विद्यार्थ्यांचे हिताचे दृष्टीनें शिक्षकास दूर करण्याविषयीं सुचविलें. ज्या शिक्षकासंबंधीं तक्रार होती तो शिक्षक सभेस हजर होता व त्यानें झालेल्या प्रकाराबद्दल दिलगिरी प्रदर्शित करून यापुढें वर्तन सुधारण्याची ग्वाही दिली व कामावरून दूर केल्यास कुटुंबाची उपासमार होईल असें सांगितलें. सभेस त्यानें असेंही निवेदन केलें कीं त्यानें शिक्षक म्हणून ३० वर्षें काम केलें असून न्याय देणाऱ्या सभासदांपैकी बरेचसे सभासद त्याचे एकाकाळचे विद्यार्थी आहेत. सभासदांपैकी एकानें शिक्षकास दूर करण्याविषयीं सुचविलें व शेजारील गांवच्या दुसऱ्या लायक व विद्वान शिक्षकाची नेमणूक करण्याबद्दल सुचविलें. दुसऱ्या एका सभासदानें विद्यार्थ्यास शिक्षक कसे मारतो व आपणासही एकवेळ कशी शिक्षा झाली होती हें निवेदन केलें. सर्व बाजूंचा विचार करून सभेनें शिक्षकास ५ रुपये दंड करून त्यास वर्तन सुधारण्याचा सल्ला दिला.

### पंचायतींचें पुनरुज्जीवन

ब्रिटिश आमदानीनंतर पंचायतींचें मूळचें स्वायत्त असें स्वरूप जाऊन त्यांचें पूर्वीचें महत्त्व कमी झालें. परंतु कालांतरानें सरकारास पंचायतींचें खेडेगांवांतील कारभाराचें महत्त्व हळूहळू पटूं लागलें व जबाबदार राज्यपद्धतीचें शिक्षण देणाऱ्या या संस्था आहेत असें मानण्यांत येऊं लागलें व यासाठी या संस्थांचें पुनरुज्जीवन पूर्वीच्या पद्धतीवर न होता विसाव्या शतकांतील कल्पनेप्रमाणें व राज्ययंत्रांतील एक घटक म्हणून करण्यांत आलें. १९२० च्या सुमारास पुष्कळशा प्रांतांनीं पंचायत कायदे करून पंचायत स्थापन करण्याबाबत प्रयत्न सुरू केले परंतु या पंचायतींचे अधिकार व कार्यक्षेत्र हें संकुचित होतें. केवळ गांवची साफसफाई, आरोग्य, शाळांच्या इमारती, वगैरेबाबतच अधिकार असत व पंचायतींचे कायदे मोडल्याबद्दल खटला चालविण्याचा अधिकार असे. कांहीं प्रांतांतून दोन प्रकारच्या पंचायती स्थापण्याची तरतूद कायद्यांत असे. पैकी एका पंचायतीकडे केवळ कारभाराचें काम असे व दुसऱ्या पंचायतीकडे न्यायदानाचें काम असे. अपुरे अधिकार व अपुरा पैसा, तसेंच गांवांतील लोकांचा निरुत्साह व सरकारची तटस्थ वृत्ति यामुळें नवीन स्वरूपांतील पंचायती लोकप्रिय होऊं शकल्या नाहींत. असजशी आपल्या देशांत राजकीय हक्काबद्दल जागृती उत्पन्न होऊं लागली तसतसे खेडेगांवच्या पुनर्घटनेकडे व उद्धाराकडे सर्व पुढाऱ्यांचें व सरकारचें लक्ष वेधलें गेलें व पंचायतींचें पूर्वस्थान प्राप्त होण्याकडे दृष्टि जाऊं लागली. पूर्वीचे न्यायदानाचे अधिकार देणेबाबत पुष्कळांचा तात्त्विक मतभेद होता व आहे. न्यायदानाचें काम पंचायतीकडून लायक पंचांचे अभावीं होऊं शकणार नाहीं व व्यक्तिविषयक द्वेष व मतभेद या भूमिकेवरून निकाल दिले जातील अशीही भीति व्यक्त केली जात असे. शिवाय न्यायदानाचे कामाचे उत्साहांत गांवचे इतर कारभाराकडे दुर्लक्ष केलें जाईल असाही आक्षेप घेण्यांत येत असे. या सर्व आक्षेपांचा विचार करून अलीकडे बऱ्याचशा प्रांतांनीं पंचायतींना मर्यादित असे न्यायदानाचे अधिकार दिले असून कांहीं प्रांतांतून हें काम समाधानकारक रीतीनें चालू आहे. गांवांतील सामाजिक व इतर प्रश्न पंचायतीकडून न्यायबुद्धीनें व साराासार व्यवहार लक्षांत घेऊनच सोडविले जात असत असें साधार म्हणावयास हरकत नाहीं. आजच्या शैक्षणिक प्रगतीच्या कालांत जुनी न्यायदानाची पद्धत आधुनिक राज्यशासनपद्धतीस अनुसरून सुधारल्यास सामाजिक प्रश्न सोडविण्याचें काम समाधानकारक होईल असें म्हणणें योग्यच होईल आणि असा प्रयत्न हल्लींचीं आपलीं लोकमतानुवर्ती प्रांतिक मंत्रिमंडळें करतील असें धरून चालण्यास हरकत दिसत नाहीं. (समाप्त)

## बिर्लांची नवी औद्योगिक योजना

श्री. जी. डी. बिर्ला ह्यांनीं हिंदी औद्योगिक विकासाची एक पंचवार्षिक योजना तयार केली आहे. पांच वर्षांत मिळून ह्या योजनेवर १२२० कोटी रु.खर्च करावा, अशी त्यांची सूचना आहे. वार्षिक २४४ कोटी रु. खर्चाची ही रकम एकूण हिंदी राष्ट्रीय वार्षिक उत्पन्नाच्या (५,२८० कोटी रु.) ४·६% आहे. वरील १२२० कोटी रुपयांपैकी ६२% रकम सरकार गुंतवील. १२२० कोटींचा हिशेब खालील प्रमाणें आहे.:–

| बाब | कोटी रु. |
|---|---|
| शेती | २४६ |
| जंगलें | ७ |
| कारखाने व खाणी | ४२८ |
| प्रेरक शक्ति | ५० |
| वहातूक | २६० |
| सामाजिक | १२५ |
| प्रवाशांचे प्रवास | ५ |
| एकूण | १२२० कोटी रु. |

बाहेरून यंत्रसामुग्री आणावी लागेल, त्यास ५१७ कोटी रुपयांची परदेशी हुंडणावळ लागेल.

सुप्रसिद्ध मुंबई योजनेचे श्री. बिर्ला हे एक योजक होते. त्या योजनेचा खर्च १४०० कोटी रु. होता, त्याची आजच्या बाजारभावानें रकम ४२२० कोटी रु. होते. त्या मानानें नव्या बिर्ला योजनेचा १२२० रु. खर्च अल्पच आहे.

## हिंद कमार्शिअल सिंडिकेट लि., कोल्हापूर

ही कंपनी कोल्हापूर येथें नोंदण्यांत आली आहे. ता. १४ मे रोजीं तिचें उद्घाटन झालें आणि तिनें कामास प्रारंभ केला. कंपनी प्रायव्हेट लिमिटेड असून तिचें भांडवल १ लक्ष रु. आहे. मे. बी. जी. देवगांवकर हे कंपनीचे चेअरमन आहेत आणि मसर्स पाटील दिवाण आणि कं.कडे मॅनेजिंग एजन्सी आहे. लहान परंतु दैनंदिन उपयोगाचे पदार्थ तयार करण्याचे कारखाने कंपनी प्रथम सुरू करणार आहे, असें समजतें. कंपनीचें रजिस्टर्ड ऑफिस कोल्हापूर येथें लक्ष्मीपुरींत चावरेकर बिल्डिंगमध्यें आहे.

## दि सिंधु रीसेटलमेंट कॉर्पोरेशन लि.

सिंधमधून निर्वासित होऊन बाहेर पडलेल्यांची पुन: व्यवस्था लावण्याच्या उद्देशानें वरील कंपनी मुंबई येथें स्थापन झाली आहे. तिचें अधिकृत भांडवल २½ कोटी रु. व वसूल भांडवल १ कोटी रु. आहे. हिंदुस्थानांत नव्या वसाहती स्थापून तेथें भागीदारांना सवलतीच्या अटींवर जमीन देण्यांत येईल. कंपन्या, सोसायट्या, इत्यादि स्थापण्याचें कामहि कंपनी हातीं घेईल. त्याचप्रमाणें, उद्योगधंदे, शेती, इत्यादींहि योजना कंपनीचे उद्देशांत आहेत. मुंबई-कराची ह्या समुद्रकिनाऱ्यावर कच्छमध्यें व्यापारी सिंधी लोकांसाठी प्रथम वसाहत स्थापिली जाईल, तिचें नांव "गांधी धाम" ठेवण्यांत यावयाचें आहे. कंपनीच्या शेअर भांडवलावरील डिव्हिडंडचा कमाल दर ६% राहील.

## दि को. पीपल्स बँक लि., लिंब

ता. २ फेब्रुवारी रोजीं लिंब येथें जाळपोळ झाली, त्यांत वरील बँकेचें ऑफिसहि जाळलें गेल्यामुळें बँकेचे महत्त्वाचे कागदपत्र, सामान, विक्रीचा माल इत्यादि नाश पावून बँकेचें बरेंचसें नुकसान झालें. सूर्त बँकेचें टेंपररी ऑफिस ३१०, मंगळवार पेठ, सातारा, येथें चालू आहे. ह्या बँकेसारख्या सर्वोपयोगी आर्थिक जातिनिरपेक्ष संस्थांसहि अविचाराची झळ लागावी, हें दुर्दैव होय.

**ऑस्ट्रेलियाकडे हिंदी कापडाची निर्गत**—जानेवारी ते जून, १९४८ ह्या मुदतींत हिंदुस्थान सरकारनें ऑस्ट्रेलियाकडे २ कोटी वार कापड पाठविण्यास संमती दिली आहे.

**हिरण्यकेशी नदीवरील धरण**—कोल्हापूर संस्थानांतील हिरण्यकेशी नदीवर धरण बांधण्याची योजना आखण्यांत आली, तर महाराष्ट्रांतील व कर्नाटकांतील ५०,००० एकर जमिनीस पाणी पुरवठा होऊं शकेल. ह्या योजनेस ३½ कोटी रु. खर्च येईल. दूधगंगेच्या धरणाची योजना स्थगित झाली असल्याचें समजतें.

**म्हैसूर येथें रेयॉनची गिरणी**—म्हैसूर सरकार एक रेयॉन मिल काढण्याच्या विचारांत आहे. त्यासाठीं लागणारा बांबू म्हैसूर संस्थानांत विपुल आहे. अमेरिकन तज्ज्ञ त्याबाबत पाहाणी करीत आहेत. भद्रावळ व कृष्णराजसागर हीं ठिकाणें प्रस्तुत गिरणी काढण्यांस पाणी व वीजपुरवठा ह्यांचे दृष्टीनें सोईचीं आहेत.

**राजाचा वाढदिवस साजरा होणार**—राजाच्या वाढदिवसानिमित्त १० जून रोजीं सुटी जाहीर करण्यांत येईल आणि सरकारी इमारतींवर यूनियन जॅक व हिंदी राष्ट्रीय निशाण हीं दोन्हीं फडकविलीं जातील. त्यानिमित्त समारंभ मात्र होणार नाहींत.

**बेझवाडा रेडिओ स्टेशन**—बेझवाडा रेडिओ स्टेशन येत्या ऑक्टोबरपासून सुरू होईल, अशी अपेक्षा आहे.

**कापडाची चोरटी निर्यात**—पश्चिम बंगालमधून पाकिस्तान मार्गें चीनकडे व मध्य पूर्वेकडे कापड चोरून पाठविण्यांत येत आहे, असें समजतें.

**जोग धबधब्यापासून आणखी वीज**—जोग धबधब्याच्या पाण्यापासून आणखी वीज निर्माण करण्यासाठीं, सध्याच्या महात्मा गांधी पॉवर स्टेशनचे खालीं सुमारें दोन मैलांवर दुसरें एक पॉवर स्टेशन उभारण्याची योजना म्हैसूर सरकार आखीत आहे.


# पूना कमर्शिअल हायस्कूल

**सरकारमान्य एस. एल. सी. परीक्षेचा अभ्यासक्रम.**

शॉर्टहँड, टाइपरायटिंग, बुक-कीपिंग असे व्यावहारिक व उपयुक्त विषय. इं. ४ थीस, ५ वींत व व्ह. फा. पास विद्यार्थ्यांसाठीं स्पेशल क्लासांत प्रवेश. नांवनोंदणी चालू.

मुख्याध्यापक,
५५४ बुधवार पेठ, जिजामाता बागेजवळ, पुणें.

# मुंबई सावकारी कायदा

| | | |
|---|---|---|
| सविस्तर, कलमेवार, चिकित्सक विवरण | किं. २॥ | रु. |
| कूळ कायदा, आवृत्ति ३ री | किं. ३ | रु. |
| नवीन भाडें नियंत्रण कायदा | किं. २ | रु. |
| द्विभार्या प्रतिबंधक कायदा | किं. १ | रु. |
| हिंदू घटस्फोट कायदा | किं. १ | रु. |
| शेतकरी कर्जनिवारण कायदा — कापडी | किं. ४॥ | रु. |
| शेतकरी कर्जनिवारण कायदा — कागदी | किं. ४ | रु. |

हीं सर्व पुस्तकें आजतागायतच्या दुरुस्त्यांसह असून त्यांत अद्ययावत् न्यायालयीन निर्णय, चिकित्सक व सविस्तर टीपा व मूळ इंग्रजी टेक्स्ट आहेत. हीं पुस्तकें पुण्याच्या व्यवसायी वकिलांनीं तयार केलीं आहेत.

पत्ता—लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. गोविंद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' ८१३ शिवाजिनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.